# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा ३५)

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**


(डॉ. जे. व्ही. दडवे)
संचालक (प्रभारी)

क्रमांक / महा.वि / गो.वि./२४५ / २०१६
दिनांक : १६/१२/२०१६

## परिपत्रक

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन यांच्या कडून प्राप्त झालेल्या, विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका सस्था तसेच अकृषि विद्यापीठे, तंत्र शास्त्र विद्यापीठ यातील प्राचार्याच्या पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत शासन निर्णयाचे पत्र माहितीकरिता सोबत जोडलेले आहे.

कळावे,

(डॉ. जे. व्ही. दडवे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतीलीपी माहितीकरिता अग्रेषित:–

१. मा.कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
२. प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये

सहायक कुलसचिव (म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील प्राचार्यांच्या पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.४८४/१५/वि.शि.१**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२**
**दिनांक :- २० ऑक्टोबर, २०१६**

संदर्भ :-१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)/वि.शि.-१, दि.२५ फेब्रुवारी, २०११

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)/वि.शि.-१, दि.०५ मार्च, २०११

३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(३९६/११)/वि.शि.-१, दि.२३ नोव्हेंबर, २०११

४) शासन शुध्दीपत्रक , उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(३९६/११)/वि.शि.-१, दि.२३ फेब्रुवारी, २०१२

५) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(३७०/११)/वि.शि.-१, दि.२८ मार्च, २०१२

६) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(५३२/११)/वि.शि.-१, दि.२२ ऑगस्ट, २०१२

७) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(५३२/११)/वि.शि.-१, दि.११ ऑक्टोबर,२०१२

८) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का-५, दि.९ मार्च, १९९०

९) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३, दि.१८ जानेवारी, २०१०

१०) समक्रमांकाच्या दि.१२ जुलै, २०१६ चा शासन निर्णय.

**शासन शुध्दीपत्रक**

संदर्भाधीन क्र.२ येथील दि.५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील ज्या शासकीय संस्था/ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालयातील प्राचार्यांचे वय ५८ वरुन ६५ वर्षे व अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांचे वय ६० वरुन ६५ वर्षे करण्यात आलेले आहे, त्यामधील राज्याच्या ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागात पात्र प्राचार्यांची कमतरता असल्याची बाब लक्षात घेता राज्यातील ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागातील उच्च शिक्षण क्षेत्रातील शासकीय

संस्था/ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालये व अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयात ६० वर्षांवरुन ६५ वर्षे वाढ करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करुन संदर्भाधीन क्र.१० येथील दि.१२ जुलै, २०१६ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

२. उपरोक्त दि.१२ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ (२) (आ) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

"२ (२) (आ) संदर्भाधीन क्र.९ येथील शासन निर्णयातील **परिशिष्ट १ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पूर्णगट तालुक्यांमधील व परिशिष्ट-२ मध्ये दर्शविण्यात आलेल्या गावांमधील** अकृषि विद्यापीठे/शासकीय संस्था/ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये डोंगराळ क्षेत्रातील समजण्यात यावीत."

तसेच उपरोक्त दि.१२ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयामध्ये खालील तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"३. संदर्भाधीन क्र.८ व संदर्भाधीन क्र.९ येथील शासन निर्णयांच्या अनुषंगाने आदिवासी व डोंगराळ क्षेत्रातील तालुके/गावांमध्ये वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या शासन निर्णयान्वये केलेले बदल त्या त्या वेळी लागू राहतील."

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक 201610201441484508 असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सिध्दार्थ खरात )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई,
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई,
४) कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे,
५) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ व २ महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
७) महालेखापाल (लेखा परीक्षा), १ व २ महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
८) सर्व उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

१०) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११) संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी,
१२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
१३) संचालक, व लेखा व कोषागारे, (५ प्रती ),
१४) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१७) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
१८) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) अवर सचिव ( सेवा-४), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई
२०)निवड नस्ती (वि.शि.१)